ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - VIII Issue - I Marathi Part - I January - March - 2019

Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

The information and views expressed and the research content published in this journal, the sole responsibility lies entirely with the author(s) and does not reflect the official opinion of the Editorial Board, Advisory Committee and the Editor in Chief of the Journal **"AJANTA"**. Owner, printer & publisher Vinay S. Hatole has printed this journal at Ajanta Computer and Printers, Jaisingpura, University Gate, Aurangabad, also Published the same at Aurangabad.

**Printed by**

Ajanta Computer, Near University Gate, Jaisingpura, Aurangabad. (M.S.)

**Published by :**

Ajanta Prakashan, Near University Gate, Jaisingpura, Aurangabad. (M.S.)

Cell No. : 9579260877, 9822620877, Ph.No. : (0240) 2400877

E-mail : ajanta1977@gmail.com, www.ajantaprakashan.com

**AJANTA - ISSN 2277 - 5730 - Impact Factor - 5.5 (www.sjifactor.com)**

# EDITORIAL BOARD

**Professor Kaiser Haq**
Dept. of English, University of Dhaka,
Dhaka 1000, Bangladesh.

**Roderick McCulloch**
University of the Sunshine Coast,
Locked Bag 4, Maroochydore DC,
Queensland, 4558 Australia.

**Dr. Ashaf Fetoh Eata**
College of Art's and Science
Salmau Bin Adbul Aziz University. KAS

**Dr. Nicholas Loannides**
Senior Lecturer & Cisco Networking Academy Instructor,
Faculty of Computing, North Campus,
London Metropolitan University, 166-220 Holloway Road,
London, N7 8DB, UK.

**Muhammad Mezbah-ul-Islam**
Ph.D. (NEHU, India) Assot. Prof. Dept. of
Information Science and Library Management
University of Dhaka, Dhaka - 1000, Bangladesh.

**Dr. Meenu Maheshwari**
Assit. Prof. & Former Head Dept.
of Commerce & Management
University of Kota, Kota.

**Dr. S. Sampath**
Prof. of Statistics University of Madras
Chennari 600005.

**Dr. D. H. Malini Srinivasa Rao**
M.B.A., Ph.D., FDP (IIMA)
Assit. Prof. Dept. of Management
Pondicherry University
Karaikal - 609605.

**Dr. S. K. Omanwar**
Professor and Head, Physics,
Sat Gadge Baba Amravati
University, Amravati.

**Dr. Rana Pratap Singh**
Professor & Dean, School for Environmental
Sciences, Dr. Babasaheb Bhimrao Ambedkar
University Raebareily Road, Lucknow.

**Dr. Shekhar Gungurwar**
Hindi Dept. Vasantrao Naik
Mahavidyalaya Vasarni, Nanded.

**Memon Sohel Md Yusuf**
Dept. of Commerece, Nirzwa College
of Technology, Nizwa Oman.

**Dr. S. Karunanidhi**
Professor & Head,
Dept. of Psychology,
University of Madras.

**Prof. Joyanta Borbora**
Head Dept. of Sociology,
University, Dibrugarh.

**Dr. Walmik Sarwade**
HOD Dept. of Commerce
Dr. Babasaheb Ambedkar Marathwada
University, Aurangabad.

**Dr. Manoj Dixit**
Professor and Head,
Department of Public Administration Director,
Institute of Tourism Studies,
Lucknow University, Lucknow.

**Prof. P. T. Srinivasan**
Professor and Head,
Dept. of Management Studies,
University of Madras, Chennai.

**Dr. P. A. Koli**
Professor & Head (Retd.),
Department of Economics,
Shivaji University, Kolhapur.

# EDITORIAL BOARD


**Dr. P. Vitthal**
School of Language and Literature
Marathi Dept. Swami Ramanand
Teerth Marathwada University, Nanded.

**Dr. Jagdish R. Baheti**
H.O.D. S. N. J. B. College of Pharmacy,
Meminagar, A/P. Tal Chandwad, Dist. Nashik.

**Dr. Sadique Razaque**
Univ. Department of Psychology,
Vinoba Bhave University,
Hazaribagh, Jharkhand.

**Prof. Ram Nandan Singh**
Dept. of Buddhist Studies University of Jammu.

**Dr. R. M. Bhise**
Principal, Shri Shivaji College of Arts,
Commerce and Science, Akola.

**Dr. A. S. Raut**
Librarian/ IQAC Coordinator,
Shri Shivaji College of Arts, Commerce and
Science, Akola.

**Dr. K. S. Khandare**
Head Dept of English, Shri Shivaji College of Arts,
Commerce and Science Akola.

**Dr. J. H. Pawar**
Head Dept of Political Science, Shri Shivaji
College of Arts Commerce and Science Akola.



**PUBLISHED BY**

**Ajanta Prakashan**
Aurangabad. (M.S.)

# CONTENTS OF MARATHI PART - I


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | ’स्त्री पुरुषतुलना’ ग्रंथाची वैशिष्ट्ये आणि संहिता<br>**संजय जनार्दन आगलावे** | १-३ |
| २ | दलित चळवळीत महात्मा फुले  राजर्षी शाहूंचे ऐतिहासिक योगदान<br>**डॉ. नरेश कवाडे** | ४-१० |
| ३ | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक चळवळीत योगदान<br>**डॉ. गणेश आर. घाडेकर** | ११-१५ |
| ४ | अण्णाभाऊ साठे : क्रांतिविचाराचं योगदान<br>**डॉ. विजय एम. जाधव** | १६-२० |
| ५ | वातावरणातील बदलामुळे शहरी व ग्रामीण भागातील शेतीपुरक व्यवसायावर झालेला परिणाम<br>**अर्चना दिनकर नेमाडे** | २१-२६ |
| ६ | आर्थिक विकासात अमर्त्य सेन यांचे योगदान<br>**डॉ. शंकर आर. चव्हान** | २७-२९ |
| ७ | सामाजीक परिवर्तनाचे संगीताचे योगदान<br>**प्रा. दिपक महादेव जामनिक** | ३०-३२ |
| ८ | शाहू  फुले व आंबेडकर यांचे सामाजिक चळवळीतील योगदान<br>**प्रा. डॉ. भारती कृष्णराव देशमुख** | ३३-३६ |
| ९ | भारतीय राज्यघटना निर्मितीत डॉ. आंबेडकरांची भूमिका<br>**डॉ. सत्यपाल हरिभाऊ कांबळे** | ३७-४२ |
| १० | खेळ स्पर्धामुळे होणारा सामाजिक विकास<br>**डॉ. प्रकाश कांबळे** | ४३-४५ |
| ११ | हवामान बदलाचा भारतीय शेतीवर होणारा परिणाम<br>**प्रा. डॉ. केंद्रे देविदास सदाशिव** | ४६-५० |
| १२ | ग्रामीण व शहरी आर्थिक विकास आणि हवामानातील बदल<br>**प्रा. डॉ. सुनिल एन. ढेरे** | ५१-५३ |
| १३ | भारतीय समाज सुधारक : डॉ. पंजाबराव देशमुख<br>**प्रा. कु. दिपाली गोपाळराव वाघमारे** | ५४-५७ |

# CONTENTS OF MARATHI PART - I


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १४ | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे ऐतिहासिक योगदान<br>**प्रा. डॉ. जयमाला लाडे** | ५८-६३ |
| १५ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्यांचे समाज सुधारणेतील योगदान आणि सद्यस्थितीत त्या समोरील आव्हाने<br>**निरजकुमार देवमनराव अंभोरे** | ६४-६९ |
| १६ | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संसदीय लोकशाही संदर्भातील विचारांचा समयोचितता<br>**प्रा. ज्योती काळबांडे** | ७०-७४ |
| १७ | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे दलित चळवळीतील योगदान<br>**वनमाला दादाराव डोंगरे** | ७५-७८ |
| १८ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे मानवतावादी विचार<br>**डॉ. मिनल खेरडे** | ७९-८१ |
| १९ | सामाजिक चळवळीत राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे योगदान<br>**डॉ. निलेश ऊ देशमुख** | ८२-८६ |
| २० | सामाजीक विकासात खेळाचे महत्व<br>**डॉ. श्रीकांत अलोणे** | ८७-८९ |
| २१ | हवामान बदल आणि कृषी<br>**प्रा. आनंद गोमाजी चव्हान** | ९०-९३ |
| २२ | केशवसुतांच्या कवितेतील सामाजिकता<br>**डॉ. सुलभा खर्चे** | ९४-१०० |
| २३ | मराठवाड्यातील परिवर्तनवादी चळवळी आणि त्यांचा साहित्यावरील प्रभाव<br>**प्रा. डॉ. मारोती कसाब** | १०१-१०९ |
| २४ | भारतीय अर्थशास्त्रज्ञांच्या अर्थविचारांचे योगदान : एक दृष्टीक्षेप<br>**डॉ. रामेश्वर मा.भिसे**<br>**डॉ. उमेश भा. घोडेस्वार** | ११०-११८ |
| २५ | सामाजिक सुधारणेसाठी विचारवंताच्या योगदानाचे अध्ययन<br>**प्रा. डॉ. आर. डी. इंगोले** | ११९-१२२ |
| २६ | राष्ट्रविकासासाठी गोपालकृष्ण गोखलेच्या विचारांची गरज<br>**प्रा. डॉ. सुनिता कलाखे** | १२३-१२५ |

# CONTENTS OF MARATHI PART - I


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| २७ | स्वातंत्र्याच्या दशकातील मराठी कादंबरीतील समाजवास्तव विशेष संदर्भ 'वैष्णव'<br>**प्रा. संदिप कोरडे** | १२६-१२९ |
| २८ | महात्मा ज्योतिबा फुले यांचे सामाजिक व शैक्षणिक योगदान<br>**डॉ. अरविंद जोशी** | १३०-१३१ |
| २९ | सामाजिक परिवर्तनाचे संगीताचे योगदान<br>**प्रा. डॉ. अस्मिता नानोटी** | १३२-१३५ |
| ३० | भारतीय अर्थव्यवस्थेतील प्रांसगिकता<br>**प्रा. डॉ. प्रदिप वि. ताकतोडे** | १३६-१३९ |
| ३१ | राजर्षी शाहु महाराज : एक समाजसुधारक व्यक्तिमत्व<br>**डॉ. निलय देशमुख** | १४०-१४२ |
| ३२ | महात्मा गांधींच्या राजकीय विचाराची सद्यस्थितीतील प्रासंगिकता<br>**प्रा. डॉ. सुखनंदन ढाले** | १४३-१४८ |
| ३३ | वि. वा. शिरवाडकरांच्या कवितेतील सामाजिकता<br>**प्रा. पुरुषोत्तम शिवचरण निर्मळ** | १४९-१५२ |
| ३४ | भारतीय समाजातील महिलांचे राजकीय सक्षमीकरण - एक अभ्यास<br>**प्रा. चामे हरिशचंद्र व्यंकटराव** | १५३-१५६ |
| ३५ | शेतीला पाणी टंचाई काळात शेततळ्याचे योगदान<br>**प्राचार्य डॉ. डी. के पाटील**<br>**श्री. वाय. डी. हरताळे** | १५७-१६२ |

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
**AJANTA - ISSN 2277 - 5730 -IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)**

# ३४. भारतीय समाजातील महिलांचे राजकीय सक्षमीकरण - एक अभ्यास

**प्रा. चामे हरिशचंद्र व्यंकटराव**
समाजशास्त्र विभाग, कला व वाणिज्य महाविद्यालय, नागठाणे.

**प्रस्तावना**

भारतीय समाजात स्त्रियांचा विचार करता स्वातंत्र्योत्तर काळात त्यांची अत्यंत वाईट परिस्थिती होती. स्त्रिने चूल आणि मूल एवढेच कार्य करणे असा मनुस्मृतीत नियम होता. त्यामुळे स्त्रियांचा सक्षमीकरणाचा विचारही करणे शक्य नव्हते. परंतु ब्रिटिशांच्या भारतामधील आगमनामुळे आणि त्यांचे शिक्षणाचे सार्वत्रिकरण धोरण आल्यामुळे समाजातील सर्व जाती—वर्गामध्ये शिक्षणाची प्रक्रिया गतिमान झाली. त्याचा परिणाम म्हणजे पहिल्या पीढीच्या लोकांनी शिक्षण घेतल्यामुळे एक विशेष प्रकारची जागरुकता त्यांनी समाजात निर्माण करण्याचा प्रयत्न सुरु केला. शिक्षण प्रक्रिया सार्वजनिक करण्यामध्ये महात्मा जोतीराव फुले या समाजसुधारकाचे अग्रगण्य स्थान आहे. तसेच त्यांची पत्नी सावित्रीबाई फुले यांनी स्त्रीशिक्षण व शुद्रांसाठी शिक्षणाच्या प्रसारास सुरुवात केली.

आधुनिक स्त्री जितक्या कार्यक्षमतेने अंतराळातील यंत्राचे बदल सांभाळू शकते तितक्याच कार्यक्षमतेने पाळण्याची दोरीदेखील सांभाळू शकते, हे स्त्रीने सिध्द करुन दाखविले आहे. स्त्री एकदा हाती घेतलेले कार्य पूर्णत्वाकडे नेल्याशिवाय राहत नाही. त्यामुळे राजकारण, समाजकारण, अर्थकारण क्षेत्रासह विविध क्षेत्रामध्ये अग्रेसर दिसून येते. स्थानिक स्वराज्य संस्थात ५० टक्के स्त्रीला मिळालेल्या आरक्षणामुळे ती समाजात पुरुषांच्या बरोबरीने सक्षम कार्य करताना दिसून येते.

**शोधनिबंधाची उद्‌दिष्टये**

१. महिला सक्षमीकरण संकल्पना अभ्यासणे.
२. राजकारणात येणाऱ्या महिलांच्या अडचणी अभ्यासणे.
३. महिलांची राजकारणातील वर्तमानस्थिती जाणून घेणे.
४. राजकारणात सक्षम असणाऱ्या महिलांच्या कार्याचा आढावा घेणे.

**गृहितके**

१. महिलांना नेतृत्व करण्याची संधी मिळाली नाही.
२. पुरुषप्रधान संस्कृतीमुळे महिलांना राजकारणात सक्षम होण्यास अडचणी निर्माण होत आहेत.

**संशोधन पध्दती**

१. या अभ्यासासाठी दुय्यम सामग्रीचा वापर केला आहे.
२. यासाठी पुस्तके, मासिके, इंटरनेट इ. वापर केला आहे.

**महिला सक्षमीकरण**

सक्षमीकरण म्हणजे मानवाच्या अंगभूत गुणांचा विकास होय. सक्षमीकरण ही संकल्पना वेगवेगळया संदर्भात वापरली जाते. म्हणजे कधी समानता, कल्याण, क्षमतावृध्दी, संतुलीकरण इ. सदर शोधनिबंधात महिला या अर्थाने विचार केला आहे. याचा अर्थ असा की, महिलांच्या मनात आत्मविश्वास, अधिकाराच्या प्रती जागृती तसेच अन्यायाशी लढण्याची नैतिक ताकद व क्षमता प्राप्त होणे म्हणजे आपल्यावर होणाऱ्या आर्थिक, सामाजिक तसेच पारंपारिक भेदभावना ओळखून प्रतिकार करेल अशी महिला तयार करणे म्हणजेच महिला सक्षमीकरण होय. या प्रक्रियेला गुणवत्तेचा आधार, आत्मविश्वास, स्वतःच्या क्षमतांचा समाधानकारक वापर व सक्षमीकरणासाठी समुहवादी भूमिका या बाबी आवश्यक ठरतात. अशा पध्दतीने महिला सक्षमीकरणाचा थोडक्यात आढावा आपल्याला मांडता येतो.

**सक्षमीकरणाच्या व्याख्या**

१. ''स्त्रीने स्वतःच्या क्षमतांची ओळख करुन घेऊन क्षमतांचा विकास करण्याच्या घरगुती व सामाजिक निर्णयाच्या प्रक्रियेत सहभागी होण्याचा प्रयत्न करणे म्हणजे सक्षमीकरण होय.''

२. जागतिक बँकेने केलेली व्याख्या :— ''आत्मविश्वासामध्ये वाढ, क्षमता, वृध्दी, सामाजिक जाणीव, जागृती, कार्यात्मक साक्षरता लिंगसमभाव सचेतन, आरोग्यविषयक जाणीव, स्वतः आत्मविश्वासाने जगणे, आत्मनिर्भर व वित्तीय संस्थाबरोबर जोडणी घेणे त्यास महिला सक्षमीकरण म्हणतात.''

**राजकारणातील महिलांचा सहभाग**

आज भारतीय स्त्री फार मोठया प्रमाणात जागृत झालेली आहे, ती प्रत्येक क्षेत्रात आपली छाप पाडण्यात यशस्वी झाल्याचे दिसून येत आहे. स्त्रिया आता मतदानासाठीही पुढाकार घेत असून राजकारणातील अनेक महत्वाची स्थाने प्राप्त केली आहेत. राजकारणात स्त्रिया ठसा उमटवू शकतात हे आता पंचायत व महापालिका पातळीवर सिध्द झाले आहे. इंदिरा गांधी, प्रतिभाताई पाटील, सोनिया गांधी, शीला दिक्षित, सुषमा स्वराज, वृंदा करात, मायावती, राबडीदेवी, वसुंधराराजे या महिलांनी राजकारणात एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. परंतु देवी समान मानलेल्या स्त्रियांना या समाजात खऱ्या अर्थाने कधीही सन्मान मिळू शकलेला नाही. राजकारणात येण्याची शक्यता तर फारच कमी होती. पूर्वी स्त्रिया आणि राजकारण ही गोष्ट मान्य केली जात नव्हती. त्यामुळे राजकारणात पुरुषांची मक्तेदारी असायची. परंतु आता ही स्थिती पूर्णपणे बदललेली दिसून येत आहे. आरक्षणाच्या व शिक्षणाच्या प्रसारामुळे राजकारणात महिलांचा सहभाग वाढला आहे. राजकारणातील स्त्री शक्ती ही राजकारणाला आता नवी दिशा देवू लागली आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये काही स्त्रियांनी आपल्या कार्याचा ठसा उमटविला आहे. जसे की सरोजिनी नायडू यांचे उदाहरण देता येईल. यांची इ.स. १९२५ ला काँग्रेसच्या अध्यक्षपदी निवड झाली होती. त्या काँग्रेसच्या पहिल्या महिला अध्यक्ष ठरल्या. यांनी पहिल्या महिला राज्यपाल होण्याचा मानही मिळविला. महिला राजकारणाच्या दृष्टिने सुचेता कृपलानी यांचाही उल्लेख महत्त्वाचा ठरतो, या देशाच्या पहिल्या मुख्यमंत्री ही होत्या.

भारताच्या राजकारणामध्ये इंदिरा गांधी यांचे नावही अग्रक्रमाने घ्यावे लागेल. ८ ऑगष्ट १९४२ या दिवशी छोडो भारत चले जाव ही चळवळ महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली सुरु झाली. या चळवळीत इंदिरा गांधी यांनीही सहभाग घेतला होता. १९५३ ला त्या स्वत: रशियाला जाऊन आल्या. १९५७ च्या काँग्रेस पक्षाच्या निवडणूक समितीवर त्यांची नियुक्ती झाली. वयाच्या ४१ व्या वर्षी त्या १९५९ साली काँग्रेस पक्षाच्या अध्यक्षा झाल्या. स्त्री म्हणून त्यांनी पंतप्रधान पद यशस्वीपणे सांभाळले, तसेच भारताच्या पहिल्या महिला राष्ट्रपती म्हणून सर्व भारतीयांना प्रतिभा पाटील यांचे नाव परिचित झाले आहे. २००७ साली त्यांनी राष्ट्रपतीपदाची निवडणूक जिंकली. १९६२ ते १९८५ या काळात त्या पाच वेळा महाराष्ट्र विधानसभेच्या सदस्या होत्या. महाराष्ट्राच्या राजकारणानंतर त्या देशाच्या राजकारणात क्रियाशील झाल्या. १९८६ ते १९८८ पर्यंत त्या राज्यसभेच्या उपसभापती होत्या, त्याचबरोबर लोकसभेच्या पहिल्या महिला सभापती म्हणून मीरा कुमार यांची झालेली निवड ही देखील राजकारणातील महिला शक्तीचे द्योतकच आहे. डॉ. ॲनी बेझंट यांचे नावही आदराने घेतले जाते. डॉ. ॲनी बेझंट ही ब्रिटीश महिला १९९३ साली भारतात आली. आणि त्या थिऑसॉफिकल सोसायटीच्या अध्यक्षा झाल्या व त्या सोसायटीच्या कार्याची धुरा त्यांनी सांभाळली.

विजयाराजे शिंदे हया ग्वाल्हेर राजघराण्याच्या राजमाता म्हणून ओळखल्या जातात, १९६२ ला त्यांनी राजकारणात प्रवेश केला, सुरुवातीला काँग्रेस व नंतर भाजप यांचे काम पाहिले. इंदिरा गांधीनी पुकारलेल्या आणीबाणीच्या काळात त्या तुरुंगात होत्या. भारतीय जनता पक्षाच्या त्या ज्येष्ठ नेत्या होत्या. तसेच काँग्रेस अध्यक्षा म्हणून सोनिया गांधीचे नेतृत्व अप्रतिम आहे.

सध्या महाराष्ट्रामधून खासदार म्हणून निवडून गेलेल्या शरद पवार यांच्या कन्या सुप्रिया सुळे, गोपीनाथ मुंडे यांच्या कन्या पंकजा पालवे यांनी मंत्रीमंडळात आपल्या व्यक्तीमत्वाची छाप निर्माण केली आहे. आणि त्यांचीच दुसरी कन्या खासदार आहे. तसेच प्रिया दत्त व भावना गवळी शिवसेनेच्या खासदार आहेत. तसेच विमलताई मुंदडा यांनीही महाराष्ट्राचे आरोग्यमंत्री म्हणून काम पाहिले आहे.

**महिलांसाठी राजकीय सहभागातील अडथळे**

कोणत्याही देशामध्ये महिलांना पुरुषासारखी समान भुमिका व समान सत्ता मिळत नाही. लिंगभेदभाव, महिलांची उपेक्षा केली जाते. त्यांना संधीपासून व राजकीय सत्तेपासून दूर ठेवले जाते. प्रगत समजल्या जाणाऱ्या देशातही महिलांच्या राजकीय सहभागाबाबत उदासीनता आहे. निवडक देशामध्ये महिलांना राजकीय पदावर ३० टक्के सुध्दा पदे मिळालेली नाहीत.

भारतातील विविध कायदे, शासनाचे धोरण, घटनादुरुस्ती इ. मुळे स्त्रिया राजकारणात आल्या असल्या तरी पुरुषप्रधान व्यवस्थेमुळे स्त्रियांची सुक्ष्मशक्ती त्यांचा प्रत्यक्ष सहभाग यावर मर्यादा येतात.

पुरुषप्रधानता, पुरुषी वर्चस्व, जातीयता इ. मुळे स्त्रियांचा प्रत्यक्ष राजकारणातील सहभागावर विपरीत परिणाम होतात.

**निष्कर्ष**

१. महिलांना आरक्षणातून राजकारणात संख्यात्मक वाढ झाली असली तरी गुणात्मक वाढ पुरुषी वर्चस्वामुळे झालेली नाही.

२. महिलांना आरक्षण मिळाले तर महिलांचे राजकारणात येण्याचे प्रमाण वाढेल व महिला सक्षमिकरणाकडे एक पाऊल पडेल.

३. महिलांनी सक्षम होणे ही काळाची गरज आहे.

४. महिलांना योग्य संधी मिळाल्यास तिच्यातील कार्यक्षमता, काटकसर प्रामाणिकपणा इ. गुणामुळे पुरुषांपेक्षा महिला अधिक कार्यक्षम होतील.

५. राजकीय स्तरावर निर्णय प्रक्रियेत महिलांचा सहभाग वाढल्यास राजकारणाला नवी दृष्टी मिळेल व राजकारणात बदल होतील.

**संदर्भसूची**

१. डॉ. रेखा हिंगोले,महिलांचे सक्षमीकरण समस्या आणि उपाय.

२. प्रा. प्रदिप आगलावे, सामाजिक संशोधन पध्दती.

३. गोऱ्हे निलम, डॉ. सुधा कुलकर्णी, चौथी जागतिक महिला परिषद, १९९५, पुणे.

४. डॉ. शुभांगी गोटे. महिला सबलीकरण, वरद पब्लिकेशन, औरंगाबाद.

५. डॉ. सौ. पद्‌मजा पाटील, डॉ. सौ. शोभना जाधव, भारतीय इतिहासातील स्त्रिया.

६. विद्युत भागवत, स्त्री प्रश्नांची वाटचाल.